



REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ | पुणें, बुधवार तारीख ११ सप्टेंबर १९४६ | अंक ३७



## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ४,६१,३०० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ५०,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एल्एल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर.

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली–पे–ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... | ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,८९,६५५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ४५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकिरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर.
आर. बी. साळवेकर,
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.






## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे) —एकमेव विक्रेते—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## विविध माहिती

**कर्जरोखे बदलण्याची मुदत वाढली**—हिंदुस्थान सरकारचे ३½ टक्यांचे कर्जरोखे बदलून घेण्याची मुदत १५ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर १९४६ अशी ठेवली होती. आतां, हे रोखे ३० सप्टेंबर अखेर स्वीकारले जातील असें जाहीर झालें आहे. मात्र, ३½ टक्यांच्या रोख्यावरील व्याज १६ सप्टेंबरपासून बंद होईल.

**गुळावरील नियंत्रण उठलें**—मुंबई प्रांतांतील गुळाच्या वहातुकीवरील व किंमतीवरील नियंत्रण सरकारनें काढून घेतलें आहे. परंतु, प्रांताबाहेर गूळ बाहेर जाऊं नये; ह्यासाठी घातलेलें बंधन कायम रहाणार आहे.

**अहमदाबाद येथें मोटार कारखाना**—कैसर फ्रेझर कॉर्पोरेशन, सुटे भाग जुळवून मोटारी तयार करण्याचा कारखाना अहमदाबाद येथें उभारण्याची जुळणी करीत आहे.

**ब्रिटिश मालाच्या जबर किंमती**—ब्रिटिश मालाचा दर्जा व किंमती ह्याबद्दल आयातदारांकडून येणाऱ्या तक्रारीमुळें ब्रिटिश कारखानदार काळजींत पडले आहेत. नव्यानेंच निघालेले पुष्कळ कारखाने आपला रद्दी माल बाहेर जबर किंमतीस विकत आहेत असें युद्धपूर्व नामवंत कारखानदारांचें मत आहे.

**रशियामधील अन्नवाटप पद्धति**—अवर्षणामुळें रशियांतील अन्नवाटप पद्धति १९४७ पर्यंत चालू राहील.

**तुर्कस्थानाकरतां ५ लक्ष पौंडांचें टेलिफोन साहित्य**—तुर्कस्थानानें ५ लक्ष पौंड किंमतीचें टेलिफोन व टेलिप्रिंटर साहित्य इंग्लंडकडून मागविलें आहे. तीन चार महिन्यांचे अवधींत हा माल तेथें येऊन पोंचेल. यंत्रें बसविलीं जात असतांना देखरेख करण्याकरतां ब्रिटिश एंजिनियर्स तुर्कस्थानला जातील.

**ईजिप्तच्या तंबाखूच्या धंद्यांतून परदेशीयांचें उच्चाटन**—ईजिप्तच्या तंबाखूच्या धंद्यांतील बहुंशीं ब्रिटिश असलेले विदेशी तज्ज्ञ काढून टाकून त्यांचे जागीं ईजिप्शन लोक नेमण्यांत येतील. या धंद्याचें शिक्षण घेण्याकरतां ईजिप्शन लोकांना परदेशीं पाठविण्यांत येईल.

**अमेरिकन मोटारीचें उत्पादन**—या वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत अमेरिकेंत १२,७६,६०७ मोटार गाड्या तयार झाल्या. १९४१ साली एवढ्याच मुदतींत तयार झालेल्या मोटारगाड्यांशीं ह्या संख्येचें प्रमाण शेकडा ३७ पडतें.

**इंटरनॅशनल बँक**—सभासद राष्ट्रांच्या वर्गणीच्या रूपानें इंटरनॅशनल बँकेला २४,३९,८६,५०० डॉलर्स मिळाले आहेत असें बँकेनें ३० ऑगस्ट रोजीं जाहीर केलें.

**चीनला बिनलष्करी अमेरिकन माल विकत मिळेल**—चीनला अमेरिकेकडून विकत मिळणारा माल बिन-लष्करी स्वरूपाचा असून तो चिनी लोकांना शांतताकालांत उपयोगी पडेल असा आहे. ह्या मालांत दारूगोळा, शस्त्रें किंवा कोणत्याही प्रकारचीं विमानें नाहींत.

**हिटलरचे श्रेष्ठ शास्त्रज्ञ अमेरिकेला मिळाले**—जर्मन शास्त्रज्ञ एकदिलानें अमेरिकन युद्धखात्याबरोबर सहकार्य करीत आहेत. कांहीं शास्त्रज्ञ रशियासाठी काम करीत असले तरी अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मतें पहिल्या प्रतीचे जर्मन शास्त्रज्ञ अमेरिकेलाच मिळाले आहेत.

**अमेरिकेंत मोटारींचा काळा बाजार**—अमेरिकेंत मोटारींच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें ह्या धंद्यांतील देशभर पसरलेला काळा बाजार पाहून तेथील सरकारी अधिकारी विवंचनेंत पडले आहेत. मोटारी विकत घेण्यास उत्सुक असलेलीं गिऱ्हाइकें नफेबाजांना नव्या गाडीवर शंभर टक्यापर्यंत नफा घेऊं देत आहेत.

**मोटारींतून टेलिफोन करण्याची व्यवस्था**—थोडक्याच दिवसांत, वाहतुकीच्या गर्दीत सांपडले असतांना किंवा बाहेर प्रवास करीत असतांना मोटारमालक मोटारींतून कचेरीशीं किंवा कुणाबरोबरही टेलिफोनवर बोलूं शकतील. मोटारींतील ह्या टेलिफोनचा पहिला परवाना सेंट लुई शहरीं देण्यांत आला आहे.


**कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड**

डिस्टिलरी लवकरच सुरू होणार

**ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात**

कॅपिटल कंट्रोल ऑर्डर ९४/अ अन्वयें दिलेल्या सवलतीनुसार आरंभीपैकीं उरलेले

**दोन लक्षांचे ६ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विक्रीस काढले आहेत.**

कृष्णा किचूर, जि. बेळगांव — विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंट्स.

अधिक माहिती—रा. डी. एच. बेडेकर सरदार विंचूरकरांचा वाडा, सदाशिव पेठ, पुणें २ यांचेकडून मिळेल.



## व्यापाऱ्यांचे माहितीकरतां

(१) ता. १ सप्टेंबरपासून बिस्किटांचे दरांत बदल करण्यांत आला आहे. दरपत्रक मागवावें.

(२) पुरेशा मालाचे अभावीं अपार मागणीइतका पुरवठा होऊं शकत नाहीं. तसेंच वाहतुकीवरही नियंत्रणें आहेत. त्यामुळें आमचे जे जुने घाऊक स्टॉकिस्ट आहेत त्यांनाच माल पाठवितां येणें शक्य आहे. इतर व्यापारी ग्राहकांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडून माल घ्यावा.

(३) कांहीं प्रमुख स्टॉकिस्ट व एजंटांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत.

(१) मुंबईः—मे. महाजन ब्रदर्स, साठे बिस्किट डेपो, आनंदनिवास, मांगवलवाडी, गिरगांव मुंबई नं. ४.

(२) गुजराथ (अहमदाबाद सोडून):—श्री. शिवलाल जी. मारतिया, १४ चिपळूणकर बिल्डिंग, पांजरापोळ १ ली लेन, मुंबई नं. ४.

(३) नाशिक जिल्हाः—मे. लाहोटी ब्रदर्स, राजस्तान चौक, संगमनेर (अहमदनगर जिल्हा).

(४) सोलापूर जिल्हाः—श्री. व्ही. सी. बावी, मेनरोड, व्हिक्टोरिया मार्केट, सोलापूर.

(५) सातारा जिल्हाः—श्री. वि. गो. उनराणी, गुरुवार पेठ, कराड, जि. सातारा.

(६) बेळगांवः—श्री. के. सी. पाटणकर, मार्केट, बेळगांव.

(७) अहमदनगर जिल्हाः—मेसर्स एल. जी. निसरगंड आणि सन्स, सेंट्रल बँक रोड, अहमदनगर.

(८) जळगांवः—मे. आयडिअल स्टोअर्स, पोलन पेठ, जळगांव (पूर्व खानदेश).

(९) कोपरगांवः—श्री. बी. व्ही. किर्लोस्कर, कोपरगांव, (जि. अहमदनगर).

(१०) नातेपुतेः—डॉ. व्ही. डी. काळे, नातेपुते, (जि. सोलापूर).

(११) सासवडः—मेसर्स दत्त स्टोअर्स, सासवड, (जि. पुणें).

पुणें, ता. ३१।८।४६ — साठे बिस्किट कंपनी, ८२७ भवानी पेठ, पुणें २.

# स्फुट विचार

## ब्रिटिश निर्गतींत वाढ

ब्रिटिश निर्गत व्यापाराची वाढ अपेक्षेपेक्षां झपाट्यानें होत आहे. युरोप, हिंदुस्थान व पश्चिम आशिया आणि आफ्रिका ह्यांकडे निर्गत बरीच वाढली आहे. पश्चिम युरोपांतील देशांनीं ब्रिटिश मालाची मोठ्या प्रमाणावर खरेदी चालविली आहे, कारण त्यांचा आर्थिक संसार अद्याप मार्गास लागलेला नाहीं. हे देश आपल्या पायावर लवकरच उभे राहूं शकतील व नंतर हा ओघ रोडावेल. हिंदुस्थान व इजिप्त ह्या देशांकडे होणारी निर्गत पुष्कळच वाढली आहे. ह्या देशांचें ग्रेट ब्रिटनमध्यें येणें साठलें आहे, तें फेडण्यास ही निर्गत त्यांना उपयोगी पडेल. अमेरिका खंडांत मात्र ब्रिटिश मालाचा उठाव फारसा वाढलेला नाहीं. खालील तक्ता पहा–

१९३८ व १९४६ मधील ब्रिटिश निर्गत

( मासिक सरासरी–लक्ष पौंड )

जानेवारी–मे

| | १९३८ | १९४६ |
|---|---|---|
| युरोप | १४४ | २५८ |
| उत्तर अमेरिका | ३७ | ४८ |
| दक्षिण व मध्य अमेरिका | ३७ | ४५ |
| ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड | ४८ | ६४ |
| हिंदुस्थान व प. आशिया | ४० | १०४ |
| आफ्रिका | ६१ | १३२ |
| एकूण ( इतर धरून ) | ३९२ | ६७८ |

## उद्योग-धंद्यांचें विकेंद्रीकरण

आधुनिक उद्योगधंद्यांमुळें मजूर-वर्गाची स्थिति अनुकंपनीय होते अशा प्रकारची अशास्त्रीय विचारसरणी प्रो. कुमारप्पा यांच्यासारखे कांहीं अर्थशास्त्रज्ञ प्रसृत करीत असतात. अर्थशास्त्रज्ञांच्या या संप्रदायाच्या मताप्रमाणें मोठे उद्योगधंदे मोडून त्याऐवजीं ग्रामोद्योगांना उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. उदा. कापडाच्या गिरण्या मोडून हातमागाच्या धंद्याला प्राधान्य देण्यांत आलें पाहिजे. मोठ्या उद्योधंद्यांच्या विकेंद्रीकरणाची ही कल्पना कितपत व्यवहार्य आहे हा प्रश्न सोडून दिला तरी ही विचारसरणी अर्थशास्त्रीयदृष्ट्या अशास्त्रीय आहे हा आक्षेप शिल्लक उरतोच. विकेंद्रीकरण याचा खरा अर्थ एकाच ठिकाणीं केंद्रित झालेले उद्योगधंदे, कच्चा माल, वहातुकीची सोय, यंत्रें चालविण्यास लागणारी प्रेरक शक्ति मिळण्याची शक्याशक्यता, इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन योग्य ठिकाणीं योग्य उद्योगधंद्यांची उभारणी करणें. या दृष्टीनें सोव्हिएट रशियाने युद्धोत्तर पंचवार्षिक कार्यक्रमांत, कापडाच्या गिरण्यांची वाढ करण्याची आखलेली योजना महत्त्वाची आहे. युद्ध होण्यापूर्वीं रशियांतील कापडाचें उत्पादन मुख्यतः मध्य–रशियांत केंद्रित झालेलें होतें. मध्य–रशियांतील गिरण्यांतून, एकंदर कापसाच्या कापडापैकीं ८६ टक्के, लोकरीच्या कापडापैकीं ७५ टक्के व रेशमाच्या कापडापैकीं ८८ टक्के कापडाचें उत्पादन होत असे. रशियाच्या उत्तर प्रदेशांत तागाचें पीक भरपूर येतें. पण युद्धपूर्वकालांत उत्तर–प्रांतांत कापडाच्या फारच थोड्या गिरण्या होत्या. आतां व्होलडा येथें तागांची एक मोठी गिरणी बांधण्यांत येत असून त्या गिरणीमुळें ' लिनन ' कापडाचें उत्पादन पूर्वीपेक्षां तिपटीनें अधिक होईल. कॉकेशसमधील स्वायत्त राज्यांतून कापूस व लोकर यांची पैदास होत असे. पण त्यापैकीं बहुतेक सर्व कच्चा माल दूरच्या ठिकाणीं असलेल्या गिरण्यांसाठीं वाहून न्यावा लागे. आतां व्होलगाच्या कांठीं कापडाच्या व लोकरीच्या नव्या गिरण्या बांधण्यांत येत असून त्यामुळें कच्च्या मालाच्या वाहतुकीची मोठी बचत होईल. या गिरण्या चालू झाल्यावर रशियांतील कापसाच्या व लोकरीच्या कापडाचें उत्पादन युद्धकालाच्या पूर्वीपेक्षा ५० टक्के अधिक वाढेल असा अंदाज आहे. युद्धकालांत ज्या उरल्समधील कारखान्यांनीं रशियन लष्कराला शस्त्रास्त्रें पुरविलीं त्याच उरल्स भागांत आतां कापडाच्या गिरण्या उभारण्यांत येत आहेत. या गिरण्यांतून सामान्य कापड तर उत्पादन करण्यांत येईलच पण उद्योगधंद्यांना लागणारें गोणपाट, कॅनव्हास, मेणकापड वगैरेही उत्पन्न करण्यांत येणार आहे. याशिवाय पूर्व सैबेरिआ, पश्चिम सैबेरिआ व मध्य आशिया येथेंही कापडाच्या गिरण्या बांधण्यांत येत असून शक्यतों प्रत्येक प्रांत स्वयंपूर्ण करण्याचा उद्देश या नवीन योजनेंत दिसून येत आहे.

## दि सेंट्रल म्युच्युअल लाइफ इन्शुअरन्स कं. लि, मुंबई

वरील कंपनीचा १९४५ सालअखेरचा वार्षिक रिपोर्ट, जमाखर्चाचा तक्ता व ताळेबंद आमचेकडे परीक्षणार्थ आला आहे. अहवालाचे सालीं कंपनीने एकूण रु. ५,७६,७५० चें काम मिळविलें असून, त्यापैकीं रु. ४,९८,७५० चें पूर्ण झालेलें आहे. नवीन मिळालेलें काम धरून कंपनीकडे चालू असलेल्या विम्याची रक्कम दहा लाखांचे वर झाली आहे. नवीन कामावरील प्रिमियमचें उत्पन्न, जवळ जवळ तीस हजार रुपयें असून, प्रिमियमचें एकूण उत्पन्न, ४४,६८० रु. इतकें आहे. कंपनीचा एकंदर व्यवस्थाखर्च रु. २१,५१०-१-४ इतका म्हणजे रिन्यूअल प्रिमियमच्या उत्पन्नाच्या फक्त १२॥ टक्के इतकाच आहे. कंपनीच्या दुसऱ्याच वर्षांत इतक्या थोड्या खर्चांत कारभार चालवून, तिनें आपल्या भावी यशाचा एक निश्चित टप्पा गांठला आहे. या कंपनीकडे आतांपर्यंत एकाही क्लेमची नोंद आलेली नाहीं, १९४५ सालाचे प्रारंभीं, कंपनीच्या लाइफ फंडाला रु. ७४,२२० रु. होते, आतां ही रक्कम १७,००७ रु. इतकी झाली आहे. कंपनीची उभारणी, सिंगल प्रिमियम पॉलिसीवरील हप्त्याच्या रकमेने झालीं असल्यामुळें, व कंपनीचा खर्च काटकसरीने चालला असल्यामुळेंच, सदर कंपनीस, दुसऱ्या वर्षांतच इतकी मोठी रक्कम लाइफ फंडासाठी जमवतां आली असली पाहिजे. कंपनीने जवळ जवळ ९२ हजार रुपये सरकारी रोख्यांत गुंतविले असून त्यापैकीं ६२ हजार रुपयांचे रोखे, कंपनीने रिझर्व बँकेंत डिपॉझिट म्हणून ठेविले आहेत. याशिवाय कंपनीच्या डिप्रिसिएशन रिझर्व फंडांत रु. ३०४२–१५–६ ची रक्कम अलग काढून ठेवण्यांत आली आहे. कंपनीस मुंबईचे श्रीमान् व्यापारी मि. नूरमहंमद चिनॉय हे चेअरमन् म्हणून लाभले आहेत. नुकत्याच झालेल्या वार्षिक सभेनें, हिंगणघाटचे प्रसिद्ध व्यापारी, शेठ जानकीदास मोहता, यांची पॉलिसी होल्डर्सचे डायरेक्टर म्हणून एकमताने निवड केली आहे व कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. शंकरराव आगाशे यांच्या अनुभवानें, कार्यक्षमतेनें व चिकाटीनें, संचालक मंडळाच्या योग्य मार्गदर्शनानें व जनतेच्या सक्रिय पाठिंब्यानें कंपनीची उत्तरोत्तर जास्त भरभराट होत जावो असें आम्ही इच्छितों.

## पुणें सें. को. बँक लि.

पुणें सें. को. बँकेनें गेल्या वर्षीं मंचर येथें एक शाखा स्थापन केली. आतां बँकेच्या १२ शाखा झाल्या आहेत. अहवालाचे वर्षीं १८ नवीन सोसायट्या स्थापन झाल्या. बँकेनें शाखा–कचेऱ्यामार्फत वाटपाचे कामीं जरूर ती मदत केली व खरेदी-विक्री संघाचें प्राथमिक कार्य सुकर केलें. पुणें जिल्ह्यांतील दुष्काळनिवारणाचे कामीं बँकेनें पुढाकार घेऊन जनतेस शक्य ती मदत केली. जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या जीवनाशीं समरस होऊन त्यांच्या उद्धाराचा प्रयत्न करण्याचें ध्येय बँकेनें आपल्यापुढे ठेवलें असल्याचें वृत्तांतावरून दिसून येतें. व्यवहार संभाळून, किंबहुना तो वाढवून हें ध्येय साध्य करण्याचे कामीं बोर्डानें केलेले परिश्रम उल्लेखनीय आहेत. खेळतें भांडवल, ठेवी, नफा, डिव्हिडंड ह्या सर्व बाबींत उत्कृष्ट प्रगति दाखवूनहि बँक ग्रामीण जनतेस जीवनोपयोगी गोष्टींचे बाबत उपयोगी पडली आहे. रावसाहेब य. द. खोले ह्यांच्या नेतृत्वाखालीं बोर्डानें केलेल्या ह्या कामगिरीबद्दल व तिच्या दृष्टिकोणांतील इष्ट अशा फरकाबद्दल बोर्डाचें अभिनंदन केलें पाहिजे.

## आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेंत कृष्णवर्णीयांची उपेक्षा

गेल्या वर्षी, कारखानदारांचे प्रतिनिधि म्हणून, श्री. एल. एम. घिलो हे इंटर नॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या पॅरिस परिषदेला गेले होते. त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेंत पुढील माहिती मिळते:—

" ऑर्गनायझेशनमधील महत्त्वाच्या जागांवर युरोपियन किंवा अमेरिकन अधिकारी आहेत. अधिकाऱ्यांच्या नेमणुकांबाबत हिंदुस्थानाची व सर्वसाधारण आशियाखंडाची उपेक्षाच करण्यांत आली आहे; आणि म्हणूनच आशियासंबंधीं प्रश्नांकडे ऑर्गनायझेशनचें फारसें लक्ष जात नाहीं. चालकमंडळाच्या सभासदांची भौगोलिक वाटणी पुढीलप्रमाणें आहे. ४० कोटि २० लक्ष लोकसंख्येच्या युरोपला ( रशिया सोडून ) १२ जागा, २७ कोटि ४३ लक्ष लोकसंख्येच्या अमेरिकेला ११ जागा आणि जगाची निम्मी लोकसंख्या किंवा ११५ कोटि ४० लक्ष लोक असलेल्या आशियाला (रशिया सोडून) फक्त ५ जागा. १५ कोटि ९० लक्ष लोकसंख्येच्या आफ्रिकेला २ जागा ( यांपैकीं १ द. आफ्रिकेला व १ ईजिप्तला ) आणि १ कोटि ८ लक्ष लोकसंख्येच्या ओशियानाला २ जागा ( दोन्ही जागा ऑस्ट्रेलियाला). ऑर्गनायझेशनच्या चालकमंडळाच्या ३२ सभासदांपैकीं १६ सभासद सरकारी प्रतिनिधींनीं निवडून द्यावयाचे, ८ कारखानदारांनीं व ८ कामगारांनीं निवडावयाचे. सरकारी प्रतिनिधींमध्यें हिंदुस्थानाला एक कायमची जागा आहे. पॅरिस परिषदेमध्यें कारखानदारांनीं एक ठराव मान्य करून आशियांतून दोन सभासद घेण्याचें कबूल केलें. परंतु हिंदी कामगारांतर्फे चालकमंडळावर प्रतिनिधी निवडला जाऊं शकला नाहीं. मात्र वर्गणी थकलेली असलेला मेक्सिकोसारखा देश चालकमंडळांतील तिन्ही जागा मिळवूं शकला. "

ही सर्व परिस्थिति सुधारण्याकरतां पॅरिस परिषदेमध्यें हिंदी प्रतिनिधींनीं अशी सूचना केली कीं, लेबर ऑर्गनायझेशननें कांहीं महत्त्वाच्या जागीं हिंदी लोकांना नेमावें व प्रादेशिक परिषद भरवावी. 'अशा प्रकारची एशियाटिक परिषद भरविण्याकरतां हिंदुस्थानसरकारनें निमंत्रण केलें आहे; तें स्वीकारलें गेल्यास पुढील वर्षी हिंदुस्थानांत परिषद भरेल.


## डॉ. दा. वा. सांडू यांचें शोचनीय निधन

द. रु. सांडू ब्रदर्स चेंबूर लिमिटेड–चेंबूर–मुंबई या कंपनीचे एक डायरेक्टर व चीफ मेडिकल ऑफिसर श्री. डॉ. दा. वा. सांडू यांस ता. २४–८–४६ रोजीं सकाळीं त्यांचे रहात्याघरीं एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून देवाज्ञा झाल्याचें कळविण्यास अत्यंत दुःख होत आहे. ते सांडू ब्रदर्स या संस्थेचे एक आधारस्तंभ होते. ते फार हुषार, मनमिळाऊ, लोकप्रिय डॉक्टर म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं आपल्या दवाखान्यांत कंपनींत तयार होणाऱ्या औषधांचे वेगवेगळ्या प्रकारें अनुभव घेतले व गुणाच्या कसोटीस औषधें उतरण्यासाठीं वेगवेगळ्या रीतीनें संशोधन करून आयुर्वेदीय जगतांत आरोग्यशास्त्रावर वेगवेगळे उपयुक्त ग्रंथ लिहिले आहेत. त्यामध्यें आहारशास्त्र, आजच्या स्त्रियांचें आरोग्य, बालसंगोपन या ग्रंथांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल.

त्यांची निधनवार्ता कळतांच त्यांचे स्नेही, आप्त, हितचिंतक यांचा बराच वर्ग त्यांचे प्रेतयात्रेला हजर होऊन त्यांचेसंबंधीं आदरभाव व्यक्त करून गेला. अनेक व्यक्तींतर्फे–संस्थांतर्फे त्यांच्या शवास पुष्पहार अर्पण करण्यांत आले. स्मशानांत त्यांच्या गुणवर्णनपर अशीं श्री. वैद्यराज रघुनाथशास्त्री तांबवेकर ( महाराष्ट्र आयुर्वेद महाविद्यालय–मुंबई ), श्री. पु. वा. कुलकर्णी, श्री. वैद्यपंचानन अभ्यंकरशास्त्री, श्री. वैद्य रामकृष्णपंत पुराणिक, श्री. नानासाहेब पंडीत वगैरे वक्त्यांचीं भाषणें झालीं.

त्यांचें वय अवघें ४६ वर्षांचें होतें. त्यांचे मागे त्यांचे तीन बंधू, कुटुंब व ३ मुलगे, ४ मुली, चुलते, चुलतबंधू असा मोठा परिवार आहे. यांचे अकाली निधनामुळें सांडू ब्रदर्स कुटुंबावर मोठाच दुःखाचा प्रसंग ओढवला असून त्यांचा मित्रसमुदाय व चाहतावर्ग यांसही खरा मित्र गेल्याचा दुःखभार बरेच दिवस जाणवेल यांत शंका नाहीं. परमेश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो !


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून
**पैसा व ज्ञान मिळवा !**
श्रीमंत कसें व्हावें–संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधिश व्हा ! किं. १॥ रु.
१०० टक्के यश–हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.
काम आणि कामिनी–तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें ! अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.
मृत्युलोकचा प्रवास–मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

**बिनचूकच्या माहितीनें**
स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
—— :इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत : ——



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

**वैमानिक वहातुकीची प्रगति**—हिंदी जनतेची विमानप्रवासाची मागणी कल्पनेबाहेर वाढली आहे. १ जानेवारी १९४६ रोजीं मुलकी वैमानिक वाहतूक पुन्हां पूर्वीप्रमाणें सुरू करण्यांत आली. इंडियन नॅशनल एअरवेज, टाटा एअर लाइन्स, एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिया व डेक्कन एअरवेज लि. या चार कंपन्या सध्यां विमानवाहतूक करीत आहेत. २७ कोटि रु. अधिकृत भांडवलाच्या आणखी १४ विमानवाहतूक कंपन्या नोंदल्या गेल्या आहेत. हवाई वाहतुकीचा परवाना देणारें मंडळ स्थापण्यांत आलें असून सर्व वैमानिक वाहतूक या मंडळाच्या परवान्यानें चालेल. सुरक्षित व नियमित वाहतूक व्हावी हा परवाना देण्याचा उद्देश आहे. सरकारी व्यवस्था पूर्ण झाली म्हणजे जनतेच्या उपयोगाकरतां १४६ विमानतळ मिळतील. ह्यांपैकीं २७ तळ सध्यांच हिंदुस्थान सरकारच्या पूर्ण ताब्यांत आले असून शिवाय हवाईदलाचे व संस्थानांचे कांहीं विमानतळ योग्य अटींवर मुलकी वाहतुकीकरतां मिळाले आहेत. अमेरिकेच्या उरलेल्या विकाऊ मालांतून १७ हँगर सरादण्यांत आलीं असून तीं दिल्ली, डमडम व सांताक्रूझ येथील विमानतळावर उभीं करण्यांत येतील.

**विक्री-कर-कायद्यांतील सुधारणा**—विक्रीकर कायदा सुधारून शक्य तितका व्यापक करण्याकरतां हिशेबाचें वर्ष संपण्यापूर्वीं मुंबई सरकार कायदेमंडळासमोर कांहीं सुधारणा मांडणार आहे.

( १ ) दुकानदार कर भरण्यास पात्र होण्याकरतां वार्षिक उलाढाल १०,००० रुपयांची व्हावी लागते. तेव्हां, किरकोळ दुकानदार ह्या कायद्यांतून सुटावेत म्हणून वार्षिक उलाढालीची रक्कम ३०,००० रु. पर्यंत वाढविण्यांत येणार आहे. ( २ ) विक्रीकर भरतांना तिमाही विक्रीचा आंकडा दाखवावा लागल्यामुळें दुकानदारांची गैरसोय होते. ती टाळण्याकरतां सहामाही विक्री दाखवून दर सहामाहीस विक्रीकर भरावा अशी सुधारणा करण्यांत येईल. ( ३ ) कायदा मान्य होऊन त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत बराच कालावधि लोटल्यामुळें, १९४५-४६ मध्यें ज्यांची उलाढाल १०,००० रु. पेक्षां जास्त होती अशा दुकानदारांना नोंदणीचा फायदा घेतां येत नाहीं. म्हणून १९४५-४६ ह्या वर्षामध्यें ज्यांची विक्री ठराविक रकमेपेक्षा जास्त आहे ( नवीन सुधारणेप्रमाणें ही रक्कम ३०,००० रु. होईल. ) व जे नोंदणी केलेल्या विक्रेत्यांना किंवा प्रांताबाहेर माल विकीत आहेत, त्यांना करविरहित माल विकत घेतां यावा, अशी योजना एका नवीन नियमान्वयें करण्यांत येईल.

— —

## साभार पोंच

1. सांगली स्टेट सें. को. बँक लि. रिपोर्ट व ताळेबंद.
2. श्री. जगदंबा को. ऑ. सोसायटी, कोकळे. वार्षिकवृत्तांत.
3. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय. ४७ वा वार्षिक वृत्तांत.
4. प. खा. ग. स. को. बँक लि. धुळें, वार्षिक अहवाल.
5. धुळें अर्बन को. बँक लि. वार्षिक अहवाल.
6. अंमळनेर को. अर्बन बँक लि. वार्षिक अहवाल.


# गव्हर्नमेंट ऑफ इंडिया

## ३॥ टक्क्याच्या बिनफेडीच्या कर्जांत बदल

**मुदतः—१५ ऑगस्ट १९४६ पासून १६ सप्टेंबर १९४६ पर्यंत**

**( दोनही दिवस धरून )**

( १ ) ३॥ टक्क्याचे १८४२-४३ चे कर्जरोखे
( २ ) ३॥ टक्क्याचे १८५४-५५ चे कर्जरोखे
( ३ ) ३॥ टक्क्याचे १८६५ चे कर्जरोखे
( ४ ) ३॥ टक्क्याचे १८७९ चे कर्जरोखे
आणि ( ५ ) ३॥ टक्क्याचे १९००-०१ चे कर्जरोखे

( गव्हर्नमेंट नोटीस नं. डी. / ४७६६-बी/४६, २४ मे १९४६ प्रमाणें परतफेडीसाठीं जाहीर झालेले )

धारण करणारांना ( १ ) १९४६ चे ३ टक्क्याचे ( दर्शनी ) १०० रु. किंमतीबद्दली १०० रु. किंमतीचे कर्जरोखे किंवा ( २ ) ( दर्शनी ) १०० रु. किंमतीच्या कर्जरोख्याबद्दली ९९ रु. किंमतीचे कर्जरोखे घेतां येतील.

३ टक्क्यांचे १९४६ चे बदली कर्जरोख्यांची १६ सप्टेंबर १९८६ पर्यंत परतफेड होऊं शकणार नाहीं. आणि हे कर्जरोखे धारण करणाराला ४० वर्षेपर्यंत ३ टक्के व्याज मिळण्याची हमी दिली जाईल.

रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास येथील शाखेमध्यें आणि इतरत्र इंपीरियल बँकेच्या शाखेंत व सर्व ठिकाणीं सरकारी तिजोरीमध्यें अर्ज घेतले जातील.

सविस्तर माहितीसाठीं यापैकीं कोणत्याही कचेरीस, शाखेस किंवा तिजोरीस लिहा.

( हिंदुस्थान सरकारच्या फायनान्स खात्याचें प्रकाशन )

**वर्ग पुस्तकें बंद**
टाटा पॉवर १२।८।४६ ते
आन्ध्र व्हॅली २८।८।४६

# मुंबई शेअर बाजार
(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

**व्याजवजा**
+इंदूर माळवा रु ४१-०-० दि. ३-९-४६
टाटा डिफर्ड रु. १२९-८-९ } दि.१०-९-४६
„ ऑ. रु. २३-०-० }
कोहिनूर रु. १२ दि. १७-९-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ३।९।४६ | बुधवार ४।९।४६ | गुरुवार ५।९।४६ | शुक्रवार ६।९।४६ | सोमवार ९।९।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | बाजार बंद | बाजार बंद | बाजार बंद | ३२१०—० | बाजार बंद |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | | | ५७०—० | |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | | | ३१०५—० | |
| ७०२; ५६६ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | | | १०१०—० | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | | | ७९०—० | |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | | | | ४५०—० | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | | | | ४२०—० | |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | | | ४२५—० | |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | | | ४६०—० | |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | | | ५-११ | |
| १७ १०; १३-७-० | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | | | २५-९-० | |
| ३-१०; २.९ | ०-३-० | मे | „ डिफर्डस् | १ | | | | ५-७-६ | |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | | | +८४५—० | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | | | २५०—० | |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | | | ३१३—० | |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-८ | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | | | ७६०—० | |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | | | ५०-१२ | |

शुक्रवार दि. ६-९-४६ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | २०१-० | आंध्र व्हॅली | ११५०-० | अलकॉक | ६६८-१२ |
| सेंट्रल | १३२-० | बॉम्बे ट्रॅम | १४०-८ | बॉंबे स्टीम | ७४५—० |
| इंडिया | २६०-० | टाटा हायड्रो | २२३-० | न्यू इंडिया | १०८—० |
| इंपी० | २९१५-० | टाटा पॉवर | ११६५-० | शिवराजपुर | ५५—० |
| | ७००-० | | | टाटा केमिकल | २५-१४ |
| रिझर्व्ह | १५८-० | | | टाटा ऑईल | १२५—० |

**इंपीरिअल बँकेकडील ठेवी व तिनें दिलेलीं कर्जें—** इंपीरिअल बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं एका भागीदारानें "शेडयूल्ड बँकांचे मानानें इंपीरिअल बँकेनें दिलेलीं कर्जें फार थोडीं दिसतात" असें सांगितलें. "इतर कांहीं बँकांप्रमाणें आपली बँक सट्टेबाजांसाठीं पैसा पुरवीत नाहीं" असें त्यास मॅनेजिंग डायरेक्टरांनीं उत्तर दिलें. ३०-६-१९३९ अखेरच्या बँकेच्या ताळेबंदांत एकुण ९६ कोटि रुपयांच्या खेळत्या भांडवलामध्यें ३६ कोटि रुपयांचीं कर्जें दिलेलीं दिसत होतीं. ३० ६ १९४६ अखेरचा ताळेबन्द २७९ कोटि रुपयांचा असला तरी कर्जांची रक्कम ५७ कोटि रुपयेच आहे. गेल्या वर्षीं ती ७३ कोटि रुपये होती. कर्जांचें एकूण ठेवींशीं प्रमाण युद्धापूर्वीं ४२.८०% होतें तें गेल्या वर्षीं २८.१०% व आतां २१ ३०% वर आलें आहे.

**रेशनिंगचा कायदा टाळण्यासाठीं होड्यांचा अवलंब—** सक्कर येथें ईदच्या सणानिमित्त आंतर्जातीय शांतिसंघाच्या मुसलमान सभासदांनीं प्रमुख हिंदूंना भोजनाचें निमंत्रण केलें होतें. रेशनिंगचे नियम मोडले जाऊं नयेत म्हणून भोजनसमारंभ म्युनिसिपल हद्दीबाहेर सिंधूनदीवर होड्यांतून उरकण्यांत आला व तेथें भोजनावर यथेच्छ ताव मारण्यांत आला.

कंट्रोल भावांत खरेदी करा
वुलन
कोटिंग व ब्लॅंकेटस्
बेव्हिन टेक्स्टाईल ट्रेडिंग कं.
X लाल मिल्सचें दुकान
कुंटे चौक, पुणें २.




तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

पॉटरी कारखान्याच्या उभारणीसाठी
ठेवी घेणें आहेत
**त्रिप्ला कमर्शिअल कं. लि.**
सरस्वती-विलास, लक्ष्मी रोड, पुणें २.
ठेवींचे दर
एक वर्ष-४½%; तीन वर्षे-५%; पांच वर्षे-६%.
अर्जाचा नमुना व माहितिपत्रक मागवा.
सोमण रानडे ॲण्ड को. मॅनेजिंग एजण्टस.

शेअर्स विकणें आहेतः--
गोवर्धन डेअरी फार्म्स लि.
गोवर्धनवाडी, पुणें १.

★ वृद्धापकाळची तरतूद
★ कुटुंबाचें संरक्षण
★ मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

हे सर्व प्रश्न आयुष्याचा विमा उतरल्यानेंच सुटूं शकतात. तरी आपला विमा
पुणें येथील सुप्रसिद्ध
**कॉमनवेल्थ**
**ॲशुअरन्स कंपनी लि.**
मध्येंच उतरा.
—सर्वत्र एजंट्स नेमणें आहेत.—
खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा
अध्यक्षः—ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर
श्री. म. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर

डॉ. गोवंडे यांचे
**स्वरबिंदू**




**डोंगरे**
यांच्या
**बालामृतानें**
अशक्त मुलें
सशक्त होतात


**सांडू**
**प्रेग युटेरो**
गरोदर स्त्री व
गर्भ यांस पोषक
द कु. सांडू ब्रदर्स चेंबूर लिमिटेड (चेंबूर, मुंबई)

पुणें चीफ एजंटः—
न्यू दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.









अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
**किर्लोस्कर पंपिंग सेटस**
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

**.पंढरीनाथ.**
ब्रिलिअन्टाईन वापरा


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाविदास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.